# कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ मार्ग

## मा. मुख्यमंत्री श्री उद्धव ठाकरे यांनी केली सहार रोड मेट्रो स्थानकाच्या कामाची पाहणी

**मुंबई, २९ फेब्रुवारी, २०२०-** मेट्रो-३ मार्गिकेतील पॅकेज ६ अंतर्गत येत असलेल्या सहार रॉड स्थानकाची पाहणी आज राज्याचे मा. मुख्यमंत्री श्री उद्धवजी ठाकरे यांनी केली.

यावेळी पर्यावरण व पर्यटन मंत्री श्री. आदित्य ठाकरे, परिवहन व संसदीय कार्य मंत्री, पालकमंत्री, मुंबई उपनगर, श्री.अनिल परब, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे, महानगर आयुक्त श्री आर ए राजीव, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनचे, व्यवस्थापकीय संचालक श्री. रणजीत सिंह देओल, संचालक (प्रकल्प), मुं.मे.रे.कॉ श्री एस.के.गुप्ता व श्री आर रामना.

मा.मुख्यमंत्र्यांनी कॉर्पोरेशनच्या अधिकारी व अभियंत्यांकडून सध्या सुरू असलेल्या मेट्रो-३ च्या कामाचा आढावा घेतला व त्यावर समाधान व्यक्त केले.

सहार रोड स्थानकाचे भुयारीकरण ४८% पूर्ण झाले असून पॅकेज -६ चे एकूण काम ५९% पूर्ण झाले आहे. सहार रोड स्थानकाची लांबी २१८ मीटर असून रुंदी 30 मीटर आहे. मेट्रो मार्गिकेच्या ट्रॅकचे आंतर बदल (inter change) व्हावे यासाठी सहार रोड ते सीएसएमआय ए आंतरराष्ट्रीय विमानतळ स्थानका दरम्यान भूमिगत सीझर क्रॉस ओव्हर बांधण्यात येणार येत आहे.२६६मीटर लांब १६ मीटर रुंद असलेल्या सीझर क्रॉस ओव्हरचे बांधकाम न्यू ऑस्ट्रियन टनेलिंग पद्धतीद्वारे करण्यात येत आहे.

For further media queries:-
**Please contact**
**Rajesh Konduparti**
+91 8469834515
Rajesh.konduparti@perceptindia.in